महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय
१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१
दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी. क्र dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/उमाशि ४/ MAHADBT/पुवि/२०१८-१९/ ७८० दि. / ०१ /२०१९.

24 JAN 2019

प्रति,
प्राचार्य / झोन प्रमुख / झोन सहाय्यक,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये/ उच्च माध्यमिक विद्यालये,
पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्र.
पुणे.

विषयः- प्राचार्य / मुख्याध्यापक यांची सहविचार सभा.

संदर्भ :-१.मा.नेहा हुमरकर, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. डिबीटी-२०१७/ प्र.क्र. २२/ एसडी-५/दि. २३ जुलै २०१८ चे तातडीचे पत्र.
२. मा.शिक्षण संचालक, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. शिष्य/१८-१९/ डीबीटी/योजना/२२४/७४८५/ दि.२१.०८.२०१८.
३.मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. ०३.०१.२०१९ रोजी दिलेली सूचना

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, विद्यार्थ्यांची सर्व ऑनलाईन शिष्यवृत्त्यांचे आवेदनपत्रे सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून MAHADBT या ऑनलाईन पोर्टलव्दारे स्विकृत करण्यात येणार आहे.

या पत्रान्वये आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीस पात्र ठरणा-या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे www.mahadbtmahait.gov.in या शासकीय स्कॉलरशिपच्या अधिकृत वेबसाईटवर आवश्यक ते कागदपत्रे अपलोड करुन ऑनलाईन अर्ज / आवेदनपत्रे दिलेल्या वेबसाईटवरील दि. ३१.०१.२०१९ पर्यंत भरण्याबाबत खालील तक्त्यात दर्शिविल्याप्रमाणे तारखांना प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीत आपणांस ऑनलाईन अर्ज भरणेबाबत माहिती देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण वर्गांसाठी प्राचार्य व उपप्राचार्य तसेच स्कॉलरशिपचे कामकाज करणारे लिपिक यांची उपस्थिती आवश्यक आहे. प्रतिनिधी पाठवू नये तसेच सदर बैठकीत पुढील प्रशासकिय विषयावर चर्चा होणार असून, संबंधित विषयाची माहिती सोबत आणावी.

१.महाडिबीटी (MAHADBT)– शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्ज, अडचणी , शिल्लक अर्ज संख्या,

२.इ. १२ वी प्रात्यक्षिक परिक्षा नियोजन .

३.इ. १२ वी गुणवत्ता वाढीसाठी करावयाचे विशेष प्रयत्न.

४.३३ कोटी वृक्ष लागवड अंतर्गत सन २०१९ मध्ये प्रत्येक शाळेत / कमवि मध्ये किमान १० वृक्ष / रोपे लागवड करणे व त्याचे संवर्धनाबाबतचे नियोजन.



Scanned by CamScanner

५.शालेय परिवहन समिती अंतर्गत इ. ११ वी व १२ वी मध्ये विद्यार्थ्यांसाठी वाहतूक नियमावली बाबतची जागरुकता, प्रबोधनाबाबत स्थानिक वाहतूक पोलिसांच्या मदतीने स्थानिक पोलिस स्टेशन तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यामार्फत व्याख्यानमाला आयोजित करणेबाबत

६.स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शालेय स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी, शालेय परिसर, इमारत वर्ग खोल्या इ. भौतिक परिसराविषयीचे नियोजन

७.पवित्र पोर्टलबाबतची कार्यवाही - रोस्टर तपासणी. (बिंदू नामावली).

| अ.क्र | झोन क्रमांक व झोनचे नांव | प्रशिक्षण वर्गाचे ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | १ पुणे शहर विभाग<br>2.कर्वेनगर, कोथरुड विभाग<br>३.पर्वती / धनकवडी / स्वारगेट विभाग.<br>४.सिंहगड विभाग | आबासाहेब गरवारे कमवि, असेंब्ली हॉल, पुणे | २९/०१/२०१९<br>स. १० ते ११.३० |
| २ | ५.कँप येरवडा विभाग<br>६.हडपसर विभाग<br>७.शिवाजीनगर, औंध पाषाण विभाग<br>८.पिंपरी / भोसरी विभाग<br>९.चिंचवड / निगडी विभाग | आबासाहेब गरवारे कमवि, असेंब्ली हॉल, पुणे | २९/०१/२०१९<br>दु. १२ ते १.३० |

प्रशिक्षणाचे ठिकाणी तक्त्यात नमूद केलेले कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोय सुविधा / एल सी डी / ओ एच पी प्रोजक्टर उपलब्ध करुन दयावेत. अधिक माहितीसाठी सदरचे परिपत्रक प्रस्तुत कार्यालयाचे www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

प्रतः- १.मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.मा.शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा. पुणे माहितीस्तव.



Scanned by CamScanner